साखर आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे

# साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,

साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५

०२०-२५५३८०४१ ते ४४, Ext.no.३१७ commsugarvikas@gmail.com

जा.क्र.साआ/विकास/कक्ष-११/प्राणी क्लेश प्रतिबंध /५६९/२०२५ दिनांक :१०/१०/२०२५

प्रति,

१.कार्यकारी संचालक, सहकारी साखर कारखाने (सर्व)

२.जनरल मॅनेजर, खाजगी साखर कारखाने (सर्व)

विषय : प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत केंद्र शासनाचे अधिनियम १९६० अंतर्गत बैलगाडीतून साखर कारखान्याकडे उस वाहतूक करताना बैलांवर होणाऱ्या क्रूरतेस प्रतिबंध करण्याबाबत

संदर्भ : १. पशुसंवर्धन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. ११.१२.२०२४ रोजीचे पत्र

२. साखर आयुक्तालयाचे पत्र दि.२७/१२/२०२४

उपरोक्त संदर्भ पशुसंवर्धन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. ११.१२.२०२४ व साखर आयुक्तालयाचे दि.२७/१२/२०२४ पत्रांन्वये विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत केंद्र शासनाचे अधिनियम १९६० अंतर्गत या कायद्यांतर्गत प्राण्यावर क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत Transport On Foot Rules, २००१ व DRAUGHT AND PACK ANIMALS RULES, १९६५ अधिसूचित केलेले आहेत.

२. सदर अधिनियमामधील कलम ११ (१) (क) नुसार कोणत्याही व्यक्ती कोणत्याही प्राण्यांला मारणे, त्याच्यावर अधिक भार लादणे, प्राण्यांना क्रूरतेने अधिक दामटणे, त्याच्या वर क्षमतेपेक्षा जास्त वजन वजनांचा भार देणे, त्यांचा छळ करणे किंवा त्या प्राण्यांना उगीच वेदना व यातना होतील अश्या बाबींच्या विषयी दंड व कारावासाची शास्ती नमूद आहे. तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० या कायद्यांतर्गत Drought and Pack १९६५ च्या नियम ६ नुसार जनावरांना दिवसभरातून ९ तासाहून अधिक काळ वाहतूक करू देऊ नये व तापमान ३७° C पेक्षा जास्त असेल अश्या ठिकाणी दुपारी १२.०० ते ३.०० या वेळेमध्ये विश्रांती देण्यात यावी असे विषद केले आहे.

३. प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० या कायद्यांतर्गत Transport On Foot Rules, २००१ च्या नियम १२ नुसार सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर कोणत्याही व्यक्तीने जनावरांची पायी ने-आण करू नये. तसेच जनावरे (बैल) ३० किमी/दिवस किंवा ८ तास व खाण्यापिण्यासाठी ४ किलोमीटर प्रति २ तास यापलीकडे प्राण्याची पायी ने-आण करता येणार नाही असे अधिसूचित केले आहे.

४. वरील सर्व बाबी विचारात घेता सर्व साखर कारखान्यांना कळविण्यात येते की, बैलगाडीतून साखर कारखान्यांकडे उस वाहतूक करताना बैलांना क्रूरतेची वागणूक देण्यात येऊ नये, बैलांवर क्षमतेपेक्षा जास्त वजन लादू नये, तसेच सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर पशुधनाची पायी ने-आण करू नये, सूर्योदयापूर्वी आणि

सूर्यास्तानंतर बैलगाडी साठी वजन काटा बंद ठेवावेत, आजारी/ जखमी /कुपोषित आणि जास्त वय असलेल्या बैलांचे स्वास्थ्य उचित रहावे यासाठी त्यांना सक्तीची विश्रांती देण्यात यावी व यासाठी स्थानिक पशुसंवर्धन विभागाच्या सहकार्याने कारखाना परिसरात एक पशुवैद्यक व एका सहाय्यकाची सेवा उपलब्ध करून घ्यावी.

राज्यामध्ये प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० नियम लागू असल्याने वरीलप्रमाणे आपल्या स्तरावरून उक्त तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सोबत- वरीलप्रमाणे

Digitally signed by
SANJAY GENDRAJ KOLTE
Date: 10-10-2025
13:45:24

(डॉ.संजय कोलते)

साखर आयुक्त

प्रत- कार्यवाहीसाठी

१.प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या., मुंबई- २१

३.कार्यकारी संचालक, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन, पुणे

प्रत- माहीतीसाठी

१. पशुसंवर्धन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे